ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{ Bi-Monthly} Volume-II, Issue-III October 2013

# बंजारा समाजातील वृद्धांच्या आरोग्य विषयक समस्या

प्रा. दशरथ जाधव,
सहाय्यक प्राध्यापक,
समाजशास्त्र विभाग,
एस. एन. डी. टी. महिला विद्यापीठ, मुंबई.

**प्रास्ताविक :**

बंजारा समुदाय ही प्राचीन जमात आहे. या जमातीत 'गोरमाटी' व 'गोर' या नावानेसुद्धा ओळखले जाते. गोर या शब्दाची व्युत्पत्ती 'गो' म्हणजे गाय आणि 'र' म्हणजे रक्षा, अर्थात गाय–बैलांची रक्षा करणारा समुदाय म्हणजे 'गोर' असा अथ अभिप्रेत होतो. गोर – बंजारांचा गुरे – ढोरे पाळण्याचा व्यवसाय असल्यामुळे त्यांना गोर म्हणत असावेत. बैलांच्या पाठीवर सामान वाहून नेण्याचा व्यवसाय या लोकांनी स्वीकारला. या जमातीस भारताच्या वेगवेगळया राज्यांत आणि केंद्रशासित प्रदेशांत भिन्न भिन्न प्रवर्गात टाकण्यात आलेले आहे. महाराष्ट्रात विमुक्त जाती, आंध्र प्रदेशात अनुसूचित जमाती, कर्नाटकात अनुसूचित जाती इ. ही जमात भारतात सर्वत्र विखुरली गेली आहे. पण आपला सांस्कृतिक ठेवा मात्र आजसुद्धा जपून ठेवण्यात यशस्वी ठरली आहे. प्रत्येक सण – समारंभ वैशिष्टयपूर्ण शैलीत साजरे करण्याची परंपरा या जमातीत दिसून येते. बंजारा समूहात वृद्धांना अतिशय महत्त्व होते. न्यायदानाच्या कामात वृद्धांची भूमिका खूप मोलाची असे. त्यांनी दिलेला निर्णय म्हणजे 'काळया दगडावरची रेघ' असा उल्लेख केला तरी अतिशयोक्ती ठरणार नाही. न्यायदानाच्या पद्धतीस 'नसाब' किंवा 'गुणा' असे संबोधतात. ही पद्धत आजसुद्धा काही प्रमाणात रुढ आहे.

बंजारा समुदायात वृद्ध हा कुटूंबप्रमुख, गावप्रमुख असे. त्यांच्या विचारानुसारच निर्णय होत. त्यांच्या विचारांना, निर्णयांना, सल्ल्यांला खूप महत्त्व होते, पण आज वृद्धांकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलत जात आहे.

'जन्म – बाल्यावस्था – युवावस्था – वृद्धावस्था – मृत्यू' अशा अवस्थांतून मानवी जीवन प्रत्ययास येते. वृद्धावस्था ही जैविक दृष्टया अपरिहार्य अवस्था आहे. वृद्ध कोणाला म्हणावे ? किती वयानंतर वृद्ध म्हणावे ? या प्रश्नांवर अजून केवळ चर्चाच दिसून येते. वृद्धापणाच्या

लक्षणामुळे त्यांना वृद्ध म्हणावे यावर वेगवेगळे मत – प्रवाह आहेत.

प्रौढावस्थेपर्यंत उत्क्रांतीचा तर नंतर परागतीचा प्रत्यय येतो. या परागतीच्या कालखंडालाच 'वृद्धावस्था' असे म्हणतात. वृद्ध व्यक्ती म्हणजे बंजारा समुदायातील अविभाज्य दुवा होता, तो आज काही प्रमाणात तुटत चालला आहे. पूर्वीइतके महत्त्व आज त्यांना नक्कीच नाही. त्यांच्याकडे बघण्याचा कुटूंबाचा व समाजाचा दृष्टिकोन बदलत असून ते संयुक्त कुटुंबातून दूर होत आहेत. इतर समाजातील वृद्धाच्या समस्येचा तुलनेत या जमातीतील वृद्धांच्या आर्थिक व आरोग्यविषयक समस्या या भिन्न स्वरुपाच्या आहेत. कारण या समुदायाचा इतिहासच रानावनातून भटकंतीचा होता, म्हणून ते साहजिकच त्यांना अधिक श्रम करावे लागत होते. रोज दिवसभर गायी – बैलांच्या मागे फिरत राहणे यामूळे ते अधिक थकत होते. त्यांची भटकंती आज थांबली आहे, पण विविध समस्यांना त्यांना सामोरे जावे लागत आहे. पूर्वीपासूनच अधिक मेहनतीचे काम ते करीत म्हणून सरते शेवटी वृद्धापकाळात त्यांना वेगवेगळे आजार उद्भवत. या आजारांवर उपचार म्हणून दवाखान्यापेक्षा 'जडी–बुटी' वर अधिक विश्वास होता आणि आजसुद्धा ब–याच प्रमाणात आहे.

**वृद्धांच्या समस्या – आरोग्यविषयक :**

1. **आरोग्यविषयक समस्या –**

वरीलप्रमाणाणे बंजारा समाजातील प्रमुख व्यवसाय म्हणजे गुरे – ढोरे पाळणे, त्यांच्या पाठीवर सामानाची वाहतूक राना – वनातून करणे. अशा प्रकारच्या मेहनतीच्या कामामुळे त्यांना अधिक श्रम खर्च करावे लागत होते. म्हणून आज त्यांना वेगवेगळया आजारांनी ग्रस्त व्हावे लागते. वृद्धावस्था ही जैविक प्रक्रिया असल्यामुळे या अवस्थेचे शरीरावर असंख्य परिणाम होतात. केस पांढरे होणे, चेह–यावर व त्वचेवर सुरकुत्या पडणे, दात पडणे, खांदे खाली झुकणे, हातापायांना कंप सुटणे इत्यादी बदलांचा समावेश होतो व या वयात रोग प्रतिकारकशक्ती क्षीण झाल्यामुळे वृद्धापकाळ आरोग्यविषयक समस्यांचे माहेरघर बनते. विविध आजारांमुळे त्यांच्या स्वभावात बदल होतो. म्हणून मानसिक दृष्टया खच्चीकरण होते. सतत आजारी असणे, त्यामुळे दवाखाना, औषध यांच्याशी एक प्रकारची घनिष्ठता निर्माण होते. वृद्धांच्या आजारपणामुळे संपूर्ण घर त्यांना घरातील अडसर समजू लागते. त्यांचा व्यवस्थितपणे सांभाळ होत नाही. वेळेवर औषधे मिळत नसल्यामुळे त्यांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होतो.

बंजारा समुदाय हा आजसुद्धा तांडया – वस्तीत राहतो. त्यांना इतरांप्रमाणे सोयीसवलती मिळत नाहीत, म्हणून जास्तीत जास्त रानटी औषधावर भर दिला जातो. या समुदायातील वृद्धांना अनेक औषधी रुपाने माहिती आहेत. विविध आजारांवर या वनस्पतींचा वापर केला जातो. विंचू चावणे, सर्पदंश अशा विविध प्रसंगी दवाखान्यापेक्षा आधी गावठी औषधींना प्राधान्य दिले जाते.

जीवनाचा बराच काळ रानावनात गेल्यामुळे वेळोवेळी विविध वनस्पतींचा अनुभव आलेला असतो, म्हणून आजसुध्दा आधुनिक काळात या वनस्पतींना त्यांनी सोडलेले नाही. हा समुदाय शहरापासून लांब राहत असल्यामुळे वेळेवर त्यांना दवाखान्यात जाणे शक्य नसते आणि आर्थिक परिस्थिती हालाकीची असेल तर मग जडीबुटीवर भागविले जाते. एखाद्या व्यक्तीच्या अंगात सतत पाच ते सात दिवस ताप असेल आणि दवाखान्यात उपचार होत नसेल तर त्यास 'बिडो' दिले जाते. नागवेलीच्या पानात औषधी वनस्पती टाकून त्याचे पान बनविणे यास 'बिडो' म्हणतात. जे तापावर 'गुणकारी' असते. अशा प्रकारची उपचारपद्धती आजसुद्धा ब–याच प्रमाणात दिसून येते.

**2. कौटुबिक समस्या –**

वृद्धापकाळ ही आजच्या विभक्त परिवाराची एक अडचण बनली आहे. हे आपण विविध स्तरांतून बघतोच. पूर्वी संयुक्त कुटुंब पद्धती होती. त्यांना सर्व सदस्यांकडून आदराची वागणूक मिळत असे, म्हणून त्यांच्या आजारपणाची जाणीव होत नव्हती, कारण कुटुंबाची संपूर्ण जबाबदारी त्यांच्यावर असल्यामुळे सतत कार्यमग्न राहत होते. यामुळे त्यांना आनंद होतो कारण, कोणतीही गोष्ट त्यांना विचारल्याशिवाय केली जात नसे, पण आज कुटुंबाच्या स्वरुपाबदद्ल कुटुंबाची संकल्पनाच बदलली आहे. म्हणून वृद्धांना अलग स्वरुपाची वागणूक दिली जाते. या काळात त्यांना माया – प्रेमाची आणि आपुलकीची अत्यंत गरज असते. ही गरज कुटुंबातील सदस्यांकडून पूर्ण केली जात नाही म्हणून कुटुंबात राहूनसुद्धा 'एकटेपणाची' भावना निर्माण होते. बंजारा समुदायात आपल्या बोली भाषेत एक म्हण प्रचलित आहे. 'डोकरा माडी बांधो, धन दौलत कमायो, पण डोकरार बाज कोटाम' ( वृद्ध व्यक्तीला डोकरा म्हणतात – त्यांनी घर बांधले, धनदौलत जमविली, पण शेवटी त्यांचा पलंग गायीबैलांना बांधण्याच्या जागी. ) तात्पर्य – कितीही काबाडकष्ट, मेहनत करुन कमवले तरी

म्हातारपणी घराचा एखादा कोपराही नशिबी नसून त्यांना गायी – बैलांच्या गोठयात सहारा घ्यावा लागतो. गोठयात ठेवण्यामागे अजून एक वेगळा हेतू असतो, तो म्हणजे घरातील मुख्य कामकाजापासून हेतूपरस्पर दूर ठेवणे आणि एखाद्या व्याधीने ग्रस्त असतील तर ती व्याधी, आजार, रोग मुलाबाळांना होवू नये, पण हा हेतू खूप कमी परिवारांत दिसून येतो. बंजारा समुदायातील वृद्धांना कामापासून मुक्ती ही कधीच मिळत नाही. शहरातील वृद्ध एक विरंगुळा म्हणून संध्याकाळी बगिचामध्ये जावून गप्पा मारतात, एकमेकांच्या अडी – अडचणी सांगून मन हलकं करतात किवा घरात बसून दूरदर्शनवरील कार्यक्रम पाहतात. मनोरंजन करतात. एकंदरीत शहरातसुद्धा वृद्धापकाळ म्हणजे एकटेपणाच आहे. पण विरंगुळा, मनोरंजन इ. करिता त्या त्या वयोतील मित्र एकत्र येवून आपापल्या समस्या सोडविण्याचा प्रयत्न करतात. त्यातून वेगवेगळी माहिती मिळते, पण बंजारा जमातीतील वृद्ध शेवटच्या घटकेपर्यंत काम करतात. फक्त कामाचे स्वरुप वेगळे असते. उदा. दोरी गाठणे, लाकडी पलंग विणणे, शेतीची अवजारे बनविणे, दुरुस्ती करणे, लहान मुलांना सांभाळणे इ. स्वरुपाचे कमी मेहनतीचे काम ते सतत करीत राहतात. रिकामे राहणे त्यांना अजिबात आवडत नाही म्हणजे शरीरात भार पेलण्याची क्षमता नसतांनासुद्धा स्वतःला कामात गुंतवून ठेवण्याचे सतत प्रयत्न करीत राहतात, म्हणून त्यांना वेगवेगळया व्याधींना, रोगांना सामोरे जावे लागते. लाकडी पलंग बनविण्याकरीता दिवसभर खाली बसून काम करावे लागते, त्यामुळे हात आणि कंबर दुखणे अशा प्रकारचे त्रास संभवतात. त्यावर दवाखाना, डॉक्टर किंवा औषधी हा उपचार नसून संध्याकाळी एक ग्लास दारु पिणे हा स्वनिर्मित उपचार असतो !

वरिल प्रकारच्या आरोग्यविषयक समस्या बंजारा समुदायातील वृद्धांना जाणवतात. दवाखान्यात जाण्याकरिता त्यांना येणा–या अडचणी खालीलप्रमाणे आहेत –

1. समुदाय, तांडा, वाडी, गाव शहरापासून दूर आहेत, जाण्यासाठी पायवाटेनेच पायी जावे लागते.
2. शिक्षणाचा अभाव, अंधश्रध्देवर अधिक भर आहे.
3. मराठी व हिंदी भाषेचा सहवास कमी असल्याने संभाषणात अडचणी येतात. बंजारा समुदायाची स्वतंत्र बोलीभाषा आहे.
4. मी म्हातारा झालो आहे, खर्च करुन काय उपयोग अशी धारणा होते.

5. रानटी औषध म्हणजे कोणत्याही आजारावरचा रामबाण उपाय हा समज त्या समाजात रुढ आहे सर्वच आजारावर अशा औषधांचा उपाय केला जातो..
6. बंजारा समाजाचा संबंध निसर्गाशी अधिक असल्यामुळे जादू, जडी – बुटी, झाड पाला अशा औषधांचा तात्पुरता इलाज केला जातो.
7. अधिक वय झाल्यामुळे डॉक्टरसुद्धा मन लावून निदान करत नाही एक औपचारिकता म्हणून उपचार केला जातो. उपयोगी वस्तूसारखं समजून चांगले उपचार दिले जात नाहीत. शरीर खिळखिळे झाल्यामुळे इंजेक्शन देण्यास नस सापडत नाही अशा वेळेस खूप शारीरिक, मानसिक त्रास होतो, म्हणून दवाखान्यात जाण्याचे टाळतात.
8. चांगले उपचार करुन सुद्धा कधी – कधी उपयोग होत नाही, कारण कधी – कधी कोणता आजार कशामुळे झाला आहे याचेच निदान व्यवस्थित होत नाही / केले जात नाही.
9. शारीरिक क्षमता कमी असल्यामुळे अधिक तीव्रतेची औषधी देवू शकत नाही, कारण ही औषधी पेलण्याची क्षमता त्यांच्यात नसते.
10. शिक्षणाचा अभाव असल्यामुळे डॉक्टरांनी लिहून दिलेले औषध तपासून पाहू शकत नाहीत किंवा ते किती वेळेस घ्यावे याचा नियम नसतो.

**संदर्भ सुची –**

1. श्री. मोहन नाईक – गोरमाटी संस्कृती आणि संकेत.
2. कै. बळीराम पाटील – गोर बंजारे लोकांचा इतिहास
3. डॉ. रुक्मिणी पवार – बंजारा लोकजीवन पध्दती
4. प्रा. मोतीराज राठोड – गोरबंजारा जनजाती एक परिचय
5. श्री. रणजीत नाईक – बुधन
6. देवगावकर एस.जी. – The Banjara
7. डॉ. यशवंत जाधव – बंजारा जाती, समाज और संस्कृति